# विमानतळ पोलिसांकडून खुनाचा गुन्हा उघडकीस

## परळीतील मयत नांदेडचा सचिन शिंदे; आरोपीही नांदेडचाच

**नांदेड/ प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी भागात एका अनोळखी तरुणाचा मृतदेह सापडला होता. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी याबाबतची शोधपत्रिका सर्व पोलिस ठाण्यांना पाठविली होती. त्या आधारे विमानतळ पोलिस ठाण्याच्या पथकाने या शोधपत्रिकेच्या मदतीने मयताची ओळख पटवली असून हा मयत तरुण नांदेडचा असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सचिन परमेश्वर शिंदे २४ रा.नाथनगर विस्तारित नांदेड अशी मयताची ओळख पटवून त्याच्या मारेकऱ्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



दि. ३१ मे २३ रोजी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात गुरनं. १५९/२३ नुसार भादंविच्या ३०२,२०१ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याची शोधपत्रिका व्हाटसअॅपच्या माध्यमातून विमानतळ पोलिस ठाण्याला ही प्राप्त झाली होती. त्याच दरम्यान बेबीताई परमेश्वर शिंदे रा. विस्तारीत नाथनगर, एमजीएम कॉलेजसमोर नांदेड यांनी दि.४ जून २३ रोजी विमानतळ पोलिस ठाण्यात त्यांचा मुलगा सचिन परमेश्वर शिंदे (२४) हा दि.२९ मे रोजी सायंकाळी ७ वाजता परभणीला पैसे वसुलीसाठी गेला होता तो आजपर्यंत परतलाच नाही, असा अर्ज दिला होता. त्या आधारे विमानतळ पोलिसांनी दि. ४ जून रोजी मिसिंग ३५/२३ नोंदवून घेतला.त्याचा तपास करीत असताना परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात गुरनं १५९/२३ नुसार भादंविच्या ३०२,२०१ कलमान्वये दाखल गुन्ह्यातील अनोळखी मयताच्या हातावर इंग्रजीत स्नेहा नावाचे टॅटू असल्याचे शोधपत्रिकेत आढळून आले त्यावरुन मयत नांदेडमधील बेपत्ता तरुण असल्याची खात्री विमानतळ पोलिसांना पटली.मयत इसम नामे सचिन परमेश्वर शिंदे **(पान २ वर..)**

## विमानतळ पोलिसांकडून...

हेच असल्याचे तपासात निष्पन्न झाले. मिसिंगमधील व नमुद परळी ग्रामीण येथील गुन्ह्यातील व्यक्ती सचिन परमेश्वर शिंदे हा एकच असल्याचे निष्पन्न झाल्यावरून मिसिंगमधील मयत व त्याचे संबंधातील रेकॉर्डवरील आरोपी नामे दिलीप हरिसिंग पवार (३८, रा. विस्तारीत नाथनगर, नांदेड) याचे शेवटचे संभाषण झाल्याचे तपासात दिसून आले. त्यावरून आरोपी दिलीप हरिसिंग पवार याला ताब्यात घेऊन चौकशी केली.दिलीप पवार याने सांगितले की, मी सचिन शिंदे यास ओळखतो. सचिन शिंदे व माझे मे महिन्यात भांडण झाले होते. त्याने मला मारहाण केली होती. त्या मारहाणीचा माझ्या मनामध्ये राग असल्यामुळे मी दि. २९ मे रोजी दुपारी ४ ते ५ च्या दरम्यान सचिन शिंदे यास सोबत घेवून माझे चारचाकी वाहन क्र. एमएच २० बीटी ९९२६ या वाहनाने परभणी मार्गे सोनपेठ येथे सचिन जाधवकडे गेला. सचिन जाधव यास गाडीमध्ये सोबत घेवून गेलो. आम्ही तिघे परळी मार्गे जात सचिन शिंदे यास दारू पाजवली. नंतर आम्ही गाडीने निघालो. सचिन जाधव हा मागच्या सीटवर बसला होता. सचिन शिंदे हा पुढच्या सीटवर बसला होता. त्यावेळेस वाहन मी चालवत होतो. काही वेळाने रामनगर तांडा येथील मोकळया पडीक गायरानावर गाडी थांबवून सचिन शिंदेचा गळा सचिन जाधव याने खिशातील रूमालाने पाठीमागून आवळला. मी माझ्या कमरेचा खंजर काढून सचिन शिंदे याच्या पोटात वार केले. त्यानंतर आम्ही दोघांनी सचिन शिंदेला गाडीतून खाली फेकून देवून बॉटलमधील डिझेल त्याच्या अंगावर टाकून त्याला पेटवून दिले. या माहितीवरुन दिलीप पवार व सचिन जाधव यांनी सचिन शिंदेचा खून केल्याचे स्पष्ट झाले. एका खुनाचा उलगडाही झाला.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे,अपर अधीक्षक अविनाश कुमार, शहर उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज गुरव, पोलिस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक प्रमुख सपोनि विजय जाधव,उपनिरीक्षक बाबा गजभारे, पोहेकॉ दारासिंग राठोड, बंडू पाटील कलंदर, पोकॉ दत्तात्रय गंगावरे, पोकॉ दिगांबर डोईफोडे, अंकुश लांडगे यांनी ही कामगिरी केली. मुख्य आरोपी दिलीप हरिसिंग पवार (३८ रा. विस्तारीत नाथनगर नांदेड) याला पुढील कार्यवाहीसाठी परळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे सपोनि गिते यांच्या ताब्यात देण्यात आले.